**ई)** तसेच शासनाच्या अर्थसंकल्पीय, पावसाळी तसेच हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य शासनाकडे असलेली मंजूर पदे, रिक्त पदे व भरलेली पदे याबाबत विधानसभा/विधानपरिषद सदस्यांकडून माहितीची विचारणा करण्यात येत असते. उपरोक्त कार्यवाहीमुळे अचूक माहिती सदनास देणे शक्य होणार आहे. त्यामुळे सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तवर सूचना उक्त “वाचा” मधील अनुक्रमाक ३ समोर नमूद शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**उ)** त्यानुसार **“संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभाग यांनी सदर कार्यवाही पूर्ण न केल्यास माहे सप्टेंबर, २०२५ देय ऑक्टोबर, २०२५ ची मासिक वेतन देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय येथे स्विकारली जाणार नाहीत”,** अशा स्पष्ट सूचना दिनांक ६.८.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. तथापि, बहुतांश आहरण व संवितरण अधिकारी आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभाग यांचेद्वारे सदर कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजी देय होणारे माहे सप्टेंबर, २०२५ चे वेतन अदा होण्यास विलंब होत आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर, शासकीय अधिकारी / कर्मचारी वेतनापासून वंचित राहू नये म्हणून सदर कार्यवाही पूर्ण करण्यास एक महिन्याची मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. सबब, खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

## शासन परिपत्रक :

१. उक्त प्रस्तावनेस अनुसरुन, सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी उक्त “वाचा” मधील अनुक्रमांक ३ येथे नमूद शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांप्रमाणे करावयाची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी एक महिन्याची अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सबब, सद्यस्थितीत सर्व कार्यालयांची दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजी देय होणाऱ्या माहे सप्टेंबर, २०२५ च्या वेतनाची देयके यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय येथे स्विकारण्यात यावीत.

३. सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी उक्त “वाचा” मधील अनुक्रमांक ३ येथे नमूद शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांप्रमाणे कार्यवाही प्रथम प्राधान्याने पूर्ण करावी. तदनंतर प्रशासकीय विभागाने आढाव्यानुसार पदे संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असल्याची खात्री केल्यानंतर खालीलप्रमाणे प्रमाणपत्र संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना स्वाक्षरी करुन द्यावे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर प्रमाणपत्र दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ देय होणाऱ्या माहे ऑक्टोबर, २०२५ च्या वेतन देयकास जोडून वेतन देयक यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय येथे सादर करावे.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक ---------------व कार्यालयाचे नाव------------------ यांच्या सेवार्थ प्रणालीत उपलब्ध असलेली सर्व पदे ही शासन निर्णयानुसार/आढाव्यानुसार अचूक आहेत व याची खात्री करण्यात आलेली आहे.

मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नाव :-

प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम :-

स्वाक्षरी

४. सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या अनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांनी उक्त “वाचा” मधील अनुक्रमांक ३ येथे नमूद परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांप्रमाणे करावयाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची **माहे ऑक्टोबर, २०२५ देय नोव्हेंबर, २०२५** ची मासिक वेतन देयके यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालय येथे स्विकारण्यात येणार नाहीत.

५. सेवार्थ प्रणालीतील मंजूर पदांचा ताळमेळ घेण्याच्या संदर्भातील प्रस्तुत कामकाज पूर्ण करण्यासाठी देण्यात येत असलेली सदर एक महिन्याची मुदतवाढ अंतिम मुदतवाढ असणार आहे. सदर कामकाज प्रथम प्राधान्याने पूर्ण करण्यात यावे. यासाठी यानंतर कोणत्याही सबबीवर मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी. सदर कामकाज प्रलंबित राहील्यामुळे वेतन प्रदानास विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची आणि संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावरील संबंधित अधिकारी यांची राहील, याचीदेखील सर्व संबंधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२५१००७११२२०५९६०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d401560638f644a547867205474ee5, cn=RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.10.07 11:23:39 +05'30'

**(डॉ.राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर)**

**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. सर्व आहरण व संवितरण अधिकारी.

२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

